● मंगळवार, दि. ५ नोव्हेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १०१ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जेष्ठहृता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

विधानसभा निवडणूक २०२४; जिल्ह्यातील पाचही विधानसभा मतदार संघात १०९ उमेदवार रिंगणात

# जालना, घनसावंगी, परतूर तिरंगी तर भोकरदन व बदनापूर मतदार संघात थेट लढतीची शक्यता

जालना विधानसभा मतदार संघ



अर्जुनराव खोतकर | कैलास गोरंट्याल | अब्दुल हफिज

घनसावंगी विधानसभा मतदार संघ



हिकमत उढाण | राजेश टोपे | सतीश घाटगे

परतूर विधानसभा मतदार संघ



आसाराम बोराडे | बबनराव लोणीकर | सुरेशकुमार जेथलिया

भोकरदन विधानसभा मतदार संघ



चंद्रकांत दानवे | संतोष दानवे

**जालना । प्रतिनिधी - विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांसाठी नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी सोमवार (दि ४) रोजी ११९ उमेदवारांनी आपले नामनिर्देशनपत्र मागे घेतले आहेत. १०९ उमेदवार हे निवडणुकीच्या रिंगणात असून यात परतूर विधानसभा मतदार संघात ११, घनसावंगी विधानसभा मतदार संघात २३, जालना विधानसभा २६, बदनापूर विधानसभा १७, भोकरदन विधानसभा मतदार संघात ३२ उमेदवार आपले नशिब आजम ावणार आहेत. यात प्रामुख्याने जालना, घनसावंगी व परतूर मतदार संघासाठी होणाऱ्या लढती ह्या तिरंगी होण्याची शक्यता असून बदनापूर व भोकरदन मतदार संघात थेट लढत होण्याची चिन्हे आहेत. महायुती तसेच महाविकास आघाडीसह वंचित बहुजन आघाडी व इतर पक्षांसह अपक्ष उमेदवारही रिंगणात असल्यामुळे त्यांच्यावर इतर उमेदवारांचे भवितव्य काही प्रमाणात मतपेटीवर प्रभाव टाकण्याचीही शक्यता सध्याच्या परिस्थितीत निर्माण झाली आहे. खऱ्या अर्थाने उद्या (दि ५) पासून उमेदवारांच्या प्रचाराला सुरुवात होणार असून येत्या २० तारखेला मतदान होणार असून २३ तारखेला मतमोजणी होणार आहे. मतदार नेमके कुणाच्या पारड्यात मत देतो**

बदनापूर विधानसभा मतदार संघ



नारायण कुचे | बबलू चौधरी

## पाच विधानसभा मतदार संघातील १०९ उमेदवारांची माहिती

घनसावंगी विधानसभा मतदारसंघातील उमेदवार, पक्ष आणि चिन्हाची माहिती पुढीलप्रमाणे उढाण हिकमत बळीराम- शिवसेना-धनुष्यबाण, जायभाये दिनकर बाबुराव -बहुजन समाज पार्टी- हत्ती, राजेशभैय्या टोपे- नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार- तुतारी वाजवणारा माणूस, कावेरी बळीराम खटके- वंचित बहुजन आघाडी-गॅस सिलेंडर, बाबासाहेब संतुकराव शेळके-समता पार्टी-ट्रम्पेट, रमेश मारोतराव वाघ- राष्ट्रीय समाज पक्ष-अंगठी, विलास महादेव वाघमारे-ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक-सिंह, शाम कचरु साळवे- बहुजन भारत पार्टी-शिट्टी, आप्पा आन्ना झाकणे-अपक्ष-संगणक, उगले गजानन रामनाथ-अपक्ष-शिमला मिर्ची, उढाण सतिश गणपतराव-अपक्ष-ऊस शेतकरी, घाटगे सतिश जगन्नाथराव- अपक्ष-प्रेशर कुकर, चोथे शिवाजी कुंडलीकराव-अपक्ष-किटली, दिनकर उघडे-अपक्ष-डिझेल पंप, निसार पटेल-अपक्ष-शिवणयंत्र, पवार ज्ञानेश्वर प्रतापराव-अपक्ष-कपाट, बाबासाहेब पाटील शिंदे-अपक्ष- फलंदाज, ड भास्कर बन्सी मगरे-अपक्ष-नागरीक, राजेंद्र बबनराव कुरणकर-अपक्ष-ट्रक, रामदास आश्रुबा तौर-अपक्ष-ग्रामोफोन, विलास आसाराम कोल्हे-अपक्ष-ऑटो रिक्षा, श्रीहरी यादवराव जगताप-अपक्ष- विजेचा खांब, सतिश मधूकर घाडगे- अपक्ष- रोड रोलर अशी आहे.

जालना विधानसभा मतदार संघातील उमेदवाराचे नाव, पक्षाचे नाव, चिन्ह पुढीलप्रमाणे अर्जुन पंडीतराव खोतकर - शिवसेना -धनुष्यबाण, किशोर यादव बोरुडे - बहुजन सम ाज पार्टी - हत्ती , कैलास किसनराव गोरंट्याल- इंडियन नॅशनल कॉंग्रेस - हात, असद उल्ला शेख अमान उल्ला शहा- सोशल डेमोक्रेटीक पार्टी ऑफ इंडिया- ॲटो रिक्षा, डेव्हीड प्रल्हादराव घुमारे-वंचित बहुजन आघाडी-गॅस सिलेंडर, निला गौतम काकडे-विकास इंडिया पार्टी-शिवण यंत्र, मिलींद बालू बोर्डे -बहुजन रिपब्लीकन सोशलीस्ट पार्टी -बॅट, ॲड. योगेश दत्तु गुल्लापेल्ली- ऑल इंडिया फॅारवर्ड ब्लॉक-सिंह, विकास छगन लहाने- पिपल्स पार्टी ऑफ इंडिया (डे.)- प्रेशर कुकर, विजय पंडितराव वाढेकर -संभाजी ब्रिगेड पार्टी-शिट्टी, विनोद राजाभाऊ मावकर - राष्ट्रीय समाज पक्ष-सफरचंद, अनवर कुरेशी सलीम कुरेशी -अपक्ष-स्पॅनर, पान २ वर

## तीस हजार मतांच्या फरकाने निवडून येणार!

माजी मंत्री बबनराव लोणीकर यांचा दावा



**मंठा । प्रतिनिधी -** मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून पात्र महिलांच्या खात्यावर ७५०० जमा झाले असून परतून विधानसभा म तदारसंघातील १ लाख १० हजार पेक्षा अधिक महिलांचा यामध्ये सम ावेश आहे. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण जयंत पाटील यासारख्या म ातब्बर नेत्यांनी त्याचबरोबर कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या सर्व पक्षांनी या योजनेची खिल्ली उडवली आणि ही योजना बंद पडावी यासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली व ही योजना बंद करावे अशी मागणी देखील केले त्यामुळे महिला सक्षमीकरणासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुढाकार घेतलेला असतांना महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ होऊन मिळू नये यासाठी म हाविकास आघाडीच्या नेत्यांनी आणि पक्षातील सर्वांनी सातत्याने प्रयत्न केले असल्याचा आरोप करत माता भगिनी महाविकास आघाडीला त्यांची जागा दाखवतील असा विश्वास व्यक्त करतांनाच आपण तीस हजार मतांच्या फरकाने निवडून येणार असल्याचा दावा माजी मंत्री बबनराव लोणीकर यांनी केला आहे.

परतूर मंठा विधानसभा म तदार संघातील मंठा तालुक्यातील वाढेगाव, पांढूर्णा, ढोकसाळ, वाघोडा तांडा, वाघोडा, वरुड / गणेशपूर, वैद्यवडगाव, अंभोराजहॉंगीर, नायगाव, तळेगाव, केहाळ वडगाव, माळेगाव या गावात आज संवाद दौऱ्यानिमित्त आयोजित केलेल्या बैठकीत ते बोलत पान २ वर

## गुटखा विक्री; पोलीस अधिक्षक म्हणतात नावे कळवा कारवाई करतो; तर स्थागुशाखा काय करते!

**जालना । प्रतिनिधी -** आदिती बॅंके गुन्ह्यातील आरोपींना ताब्यात घेण्यासह त्यांच्याकडून मुद्देमाल जप्त करण्यात आला असल्याची माहिती देण्यासाठी पोलीस अधिक्षक कार्यालयात पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जामखेड परिसरात होलसेल गुटखा विक्रेत्यांने बस्तान म ांडले असल्यासंदर्भात पत्रकारांनी प्रश्न उपस्थित केला. यावर पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांनी त्या गुटखा माफीयांची नावे कळवा तात्काळ टिम पाठवून कारवाई करतो असे म्हटले आहे, याच पत्रकार परिषदेत पोलीस अधिक्षक श्री बन्सल यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव व त्यांच्या टिमकडुन करण्यात आलेल्या कारवाईचे कौतूक केले. पोलीस निरिक्षकांची प्रशंसा केली. महत्त्वाचा मुद्दा म्हणजे जामखेड परिसरात मोठ्या प्रमाणात सर्रास गुटखा व्रिकी होत असल्याची माहिती असून या भागातून होलसेल गुटखा विक्री होते आहे. ही बाब स्थानिक गुन्हे शाखेच्या नजरेस न पडावी म्हणजे हास्यास्पदच म्हणावे लागेल. एरवी कोणतेही माहिती अथवा पुरावा नसतांना देखील गुन्हाचा तपास करण्यासाठी पोलीसांना फार वेळ लागत नाही. मात्र, जालना जिल्ह्यातील गुटखा विक्रीकडे त्यांचे सर्रास दुर्लक्ष होते आहे. कोणत्या भागातून, कधी गाड्या भरभरुन गुटखा शहरात दाखल होते, कोणत्या अडवळणीच्या मार्गावर गाड्या थांबवून तो माल परस्पर शहरात वितरीत होते. याची पुसटशी कल्पना स्थानिक गुन्हे शाखेला नसावी हे कितपत सत्य? जाम खेड पसिरातील गुटखा माफियाचे तर संबंधच मुळात कुणा कुणाशी आहेत, हे पोलीसांना सांगण्याची गरजच नाही त्यातल्या त्यात स्थानिक गुन्हे शाखेतील अधिकाऱ्यांना तर मुळीच नाही. त्यामुळे नावे कळवा कारवाई करतो, असे पोलीस अधिक्षकांनी म्हणावे तर स्थानिक गुन्हे शाखा कशासाठी? असा प्रश्न निर्माण होते. मागील आठवड्यातच एका वृत्तपत्राने गुटखा विक्रीची पोलखोल करत कोणता पोलीस अधिकारी-कर्मचारी कोणत्या पोलीस ठाण्याअंतर्गत वसुलीचे काम करतो याची यादीच प्रसिद्ध केली होती. याची साधी दखलही पोलीस अधिक्षकांना घ्यावी वाटली नाही, हे विशेष. आता जामखेडच्या गुटखा माफीयाला एका पोलीस कर्मचाऱ्याचेच सहकार्य होत असल्याची चर्चा असून याबाबत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांना युवा आदर्शच्या प्रतिनिधीने विचारले असता त्यांनी याबाबत चेक करु असे म्हणत जास्त बोलणे टाळले.

### गुटखा माफियांना ताब्यात घेणे गरजेचे!

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेदरम्यान पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांनी गुटख्यासह गांजा, अवैध दारू, हातभट्टीवरील कारवाईची माहिती दिली. माहितीवरून जिल्ह्यात सर्रास अवैध धंदे सुरु असल्याचे दिसून येते. प्रतिबंधित गुटख्यावर पोलीस व अन्न औषधी प्रशासनाकडून होणारी कारवाई ही केवळ देखावा असल्याचे भासते. मानवी आरोग्यास घातक औषधांचा साठा काही दिवसांपुर्वी जालना शहरात सापडला यात पोलीसांनी पाळेमुळे शोधून काढत जिल्ह्याबाहेरील व राज्याबाहेरील त्याचे कनेक्शन शोधून अनेकांना ताब्यात घेतले होते. प्रतिबंधीत गुटख्याचे मात्र तसे होतांना दिसत नाही. गुटख्यासह वाहन जप्त करून वाहन चालकांवर कारवाई होते. मात्र, हा गुटखा आला कुठून चालला कुठे यात कोणकोणते गुटखा माफिया आहेत याचा मागोवा स्थानिक गुन्हे शाखा घेत नाही. किंवा त्या गुटखा माफिया पर्यंत स्थानिक गुन्हे शाखेचे हात पोहचत नाहीत. कानून के हात लंबे होते है हा केवळ चित्रपटातील एक डायलॉग राहिला आहे.

युवा आदर्श

**कारवाई ...**

बोगस दवा इंजेक्शन
प्रभाव चाले वाढता
खऱ्याचा रे अभाव
खोटी व्याधि जडता
कसा करालं इलाज
असाध्य रोग जडता
मरणप्राय: हो वेदना
विश्वास श्वास उडता
भ्रष्टाचार हा कुष्ठरोग
अवयव लागे झडता
हातात असून अमृत
देवा दानवा झगडता
हिशोब पापपुण्याचा
खाते वह्या उघडता
करे वाटे तव आम्हा
आक्रीत काही घडता
विषवेलं मुळापासून
कधी सांगा उखडता
दोषीं वरची कारवाई
नको हात आखडता
कायदे आहेत सक्षम
निर्णयां आणा दृढता
वेळेत करा नसबंदी
समाजा देई सुदृढता

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

संपादकीय पान

# क्रिकेटचा किंग, चेस मास्टर!

क्रिकेटचा किंग, चेस मास्टर, विक्रमवीर, रन मशिन यासारखी अनेक बिरुदावली ज्याच्या नावापुढे लागली आहेत तो भारताचाच नव्हे तर जगातील सर्वोत्तम फलंदाज, भारताचा कोहिनूर विराट कोहलीचा आज ३६ वा वाढदिवस. किंग कोहलीला वाढदिवसाच्या सर्वप्रथम हार्दिक शुभेच्छा! क्रिकेट या खेळाने जगाला अनेक म हान खेळाडू दिले. सचिन तेंडुलकर हा त्यापैकीच एक महान खेळाडू. क्रिकेटमधील दैदिप्यमान कामगिरीने तो क्रिकेटचा देव बनला. जवळपास दोन तप त्याने क्रिकेटवर अधिराज्य गाजवले. भारताला अनेक अविश्वसनीय विजय त्याने मिळवून दिले. २०१३ साली त्याने निवृत्ती स्वीकारली. निवृत्ती स्वीकारण्यापूर्वी त्याने विक्रमांचे एव्हरेस्ट गाठले. तो निवृत्त झाल्यावर त्याच्या इतक्या क्षमतेचा खेळाडू पुन्हा भारताला मिळेल का ? असाच प्रश्न संपूर्ण क्रिकेट विश्वाला पडला होता. ज्या प्रश्नाचे उत्तर कोणाकडेच नव्हते त्या प्रश्नाचे उत्तर खुद्द सचिनकडे होते. सचिनला जेंव्हा प्रश्न विचारण्यात आले की तुझा विश्वविक्रम कोणता खेळाडू मोडेल असे तुला वाटते तेंव्हा त्याने क्षणाचाही विलंब न करता उत्तर दिले 'विराट कोहली' सर्वांना त्यावेळी ही अतिशोक्ती वाटली पण सचिनने विराटची गुणवत्ता हेरली होती. निवृत्त होण्यापूर्वी चार पाच वर्ष तो आणि विराट एकत्र खेळले होते त्यामुळे विराट कोणत्या क्षमतेचा खेळाडू आहे आणि तो काय करू शकतो हे सचिनला माहीत होते त्यामुळेच सचिनने आपला वारसदार म्हणून विराटची निवड केली होती. विराटने सचिनचे म्हणणे अवघ्या दहा वर्षात खरे करून दाखवले आणि सचिनचा विश्वास सार्थ ठरविला. आज विराट देखील सचिन प्रमाणे विक्रमांचे इमले चढत आहेत इतकेच नाही तर सचिनचे अनेक विक्रम त्याच्या दृष्टिक्षेपात आले आहेत. सचिनच्या एकदिवसीय शतकांचा विक्रम त्याने नुकताच मोडला असून त्याच्या नावावर आता ५० एकदिवसीय शतक आहेत. त्याने त्याच्या कारकीर्दीत एकूण ८० शतक झळकावले आहेत. एकदिवसीय क्रिकेट प्रमाणेच विराट सचिनच्या एकूण १०० शतकांचा विक्रमही लवकरच आपल्या नावे करेल यात शंका नाही कारण आज त्याच्या नावे ८० शतके आहेत. कसोटीत त्याने २९ शतके झळकावली आहेत तर एकदिवसीय सामन्यात ५० शतके त्याच्या नावावर आहेत. टी २० सामन्यातही त्याचे एक शतक आहे. आज तो ३६ वर्षाचा होत आहे. त्याचा फिटनेस जबरदस्त आहे. वीस वर्षाचा खेळाडू देखील त्याच्यासमोर फिका पडेल असा त्याचा फिटनेस आहे त्यामुळे तो आणखी तीन -चार - वर्ष सहज खेळू शकतो. त्यामुळे तो हा विक्रम सहज मोडेल. विशेष म्हणजे त्याच्या जवळपास जगातील दुसरा कोणताच खेळाडू नाही. विराट केवळ विक्रमवीर नाही तर तो आज जगातला महान फलंदाज बनला आहे. उत्तम खेळाडू ते महान खेळाडू बनण्यापर्यंतचा त्याचा प्रवास अचंबित करणारा आहे. अवघ्या दहा बारा वर्षात तो आज जगातला महान खेळाडू बनला आहे. त्याने धावांची टांकसाळ उभारली आहे. प्रत्येक सामन्यात तो खोऱ्याने धावा काढत आहे. त्याची बॅट म्हणजे जणू धावांची मशिन, त्याच्या बॅट मधून धावांची बरसात होत आहे म्हणूनच आकाश चोप्रा त्याला विराट द रन मशिन कोहली असे म्हणतो. त्याने काढलेल्या शतकांपैकी ९५ टक्के शतके भारताच्या विजयास कारणीभूत ठरली आहेत यावरून त्याच्या शतकांचे मोल लक्षात येते. धावांचा पाठलाग करताना तर त्याने सर्वाधिक शतके झळकावली आहेत म्हणूनच त्याला चेस मास्टर असेही म्हंटले जाते. विराटने शतक झळकावले म्हणजे भारत विजयी झाला असेच समीकरण बनले आहे. केवळ शतकच नव्हे तर त्याच्या अनेक छोट्या मोठ्या खेळी भारताला विजय मिळवून देणाऱ्या ठरल्या. भारताला अनेक अविश्वसनीय विजय त्याने मिळवून दिले आहेत. ऑस्ट्रेलियात झालेल्या टी २० विश्वचषक स्पर्धेतील पाकिस्तान विरुद्धचा साम ना आठवा. आपण तो सामना केवळ विराटमुळे जिंकू शकलो. हातातून गेलेला सामना त्याने ज्याप्रकारे खेचून आणला ते पाहून प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फिटले. तशी खेळी फक्त आणि फक्त विराटच खेळू शकतो. मागील वर्षी भारताने जिंकलेल्या टी २० विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध त्याने ७० धावा काढून भारताला विश्व विजयी केले होते. या दोन खेळी फक्त एक उदाहरण आहे. तशा प्रकारच्या अनेक खेळी करून त्याने भारताला अनेक अशक्यप्राय विजय मिळवून दिले आहेत. कठीण समय येता विराट कामी येई.... असे उगीच क्रिकेटप्रेमी म्हणत नाहीत. टी २० विश्वचषकात भारताला विजय मिळवून देऊन त्याने क्रिकेट प्रेमिंचे एक स्वप्न पूर्ण केले आहे आता यावर्षी होणाऱ्या विश्व कसोटी अजिंक्यपद स्पर्धेत ( थढउ ) आणि एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत त्याने भारताला अजिंक्यपद मिळवून द्यावे अशी क्रिकेटप्रेम िंची त्याच्याकडून अपेक्षा आहे. सध्या तो त्याच्या सर्वोत्तम फॉर्मम ध्ये नाहीये मात्र तो असा खेळाडू आहे जो कधीही फॉर्मात येऊ शकतो. तो लवकरच त्याच्या सर्वोत्तम फॉर्ममध्ये परतेल आणि भारताला कसोटी आणि एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेचे अजिंक्यपद मिळवून देईल यात शंका नाही. विराटला पुन्हा एकदा वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!



**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# योग्य वयात लग्न झाल्यास बऱ्याच समस्या सुटतील- सौ. रूपल मोहता

## सत्यनारायण बांगड यांना माहेश्वरी समाजाचा सर्वोच्च जीवन गौरव पुरस्कार प्रदान

**जालना । प्रतिनिधी -** लग्न योग्य वयात झाल्यास बऱ्याच समस्या सुटतील. ही बाब विचारात घेता पालकांनी करिअरमध्ये जास्त वेळ घालवू नये. पुढील शिक्षण सासरच्या मंडळीवर सोपवावे, असे प्रतिपादन मिस इंडिया युनिव्हर्स सौ. रुपल म ोहता यांनी येथे बोलताना केले.

जालना माहेश्वरी समाजाच्यावतीने रविवार दि. ३ नोव्हेंबर रोजी येथील महेश भवनात आयोजित दीपावली स्नेहमिलन व सत्यनारायण बांगड यांना जालना माहेश्वरी समाजाचा सर्वोच्च जीवनगौरव पुरस्कार प्रदान सोहळ्यात प्रमुख वक्त्या म्हणून सौ. मोहता बोलत होत्या. व्यासपीठावर रामनिवास मानधानी, दामोदर बजाज, सौ. किरण राठी, विजय मोहता, जालना माहेश्वरी समाजाचे अध्यक्ष विजय गो. राठी, सचिव उमेश बजाज, धनंजय झंवर, निखिल चेचानी यांची उपस्थिती होती.

यावेळी सौ. मोहता पुढे म्हणाला की, सुनांनी सासूला मैत्रीण, बेस्ट फ्रेन्ड बनवले तर सासू- सुनेतील नाते सुखमय व चांगले बनते. हल्ली सासूची प्रतिमा वाईट बनवली गेली आहे. प्रत्यक्षात ती आईच असते. सून मुलगी तर तर सासू आई बनवून राहिली तर स्वर्गापेक्षा सुंदर सुखी कुटुंब बनल्याशिवाय राहणार नाही असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आपल्या आवडीचे कार्यक्षेत्र निवडून आत्मविश्वासाने परिश्रम घेतले तर यश तुमच्या पायाशी लोळण घेईल. स्वप्नांचा पाठलाग करताना झोप उडाली पाहिजे. झोपेत पडतात ती स्वप्ने नव्हे तर झोप येऊ देत नाही ती स्वप्ने असतात. रूपाने सुंदर दिसते ती, सुंदर नव्हे तर जीवनात चांगले काम करते ती सुंदर असते, असे त्या म्हणाल्या.

याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते सत्यनारायण बांगडे यांना माहेश्वरी सम ाजाचा सर्वोच्च जीवनगौरव पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात अध्यक्ष विजय गो. राठी यांनी सम ाजाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमाची माहिती दिली.



दिप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली महेश वंदना सौ. वैशाली राठी यांनी गायली तर कु. सुरभी सारडा यांनी रूपल मोहता यांचा परिचय करून दिला. सूत्रसंचलन डॉ. कवीता सोनी व सौ. अलका सारडा यांनी केले तर आभार उमेश बजाज यांनी मानले.

या कार्यक्रमाला ओमप्रकाश मंत्री, संजय दाड, विजय राठी, कांतीलाल राठी, सत्यनारायण सारडा, अनिल सोनी, रामकिशन मंत्री, कैलास लोया, गोपीकिशन जाजू, कमलकिशोर मालपाणी, किशन भक्कड, विनोद बियाणी, राजेंद्र मंत्री, सुधिर मंत्री, राजबाबु मंत्री, पुसाराम मुंदडा, सतिश राठी, शैलेश मुदंडा, डॉ. आशुतोष सोनी, जुगलकिशोर होलाणी, प्रा. स्वप्निल सारडा, शाम लखोटिया, दिपक सोमाणी, सौ. अलका सारडा, डॉ. कवीता सोनी, सौ. वैशाली राठी, कु. सुरभी सारडा, नारायण बजाज, अमोल बांगड, ललित चेचाणी, शिवप्रसाद गट्टाणी, महेश सारडा, पुरूषोत्तम मुंदडा, सत्यनारायण तोष्णीवाल, राहूल राठी आशिष राठी, प्रसाद भुतडा यांच्यासह समाज बांधव आणि भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# पत्रकार सिद्धार्थ तायडे राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

मेहकर । प्रतिनिधी - डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाटिका अशोक हॉल मेहकर येथे तथागत बहुउद्देशीय संस्था मेहकर आयोजित तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटना राजमाता माँ जिजाऊ स्वयंसहाय्यता महिला बचत गट यांच्या संयुक्त विद्यमाने साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त पुरस्कार वितरण सोहळ्यात सामाजिक कार्यकर्ते तथा उत्कृष्ट पत्रकार सिद्धार्थ तायडे यांना त्यांच्या उत्कृष्ट पत्रकारिता आणि साहित्याने समाजाची निरपेक्ष सेवा केल्याबद्दल व वैशिष्ट्यपूर्ण सन्मानार्थ त्यांना राज्यस्तरीय साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे समाजभूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. स्मृतीचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन तथागत ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संदीप भाऊ गवई, भाई कैलास सुखधाने,आफताब जी खान, किशोर गवई, भास्करजी काळे, अनिल शर्मा, अरुण डोंगरे, छोटु गवळी, कुणाल माने, यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून रवी मिस्किन, गजानन सरकटे दुर्गादास अंभोरे, संदीप राऊत, सुनिल वनारे, राधेशाम खरात,महादेव मोरे, देवानंद अवसरमोल, लक्ष्मी कस्तुरे, प्रतिभा गवई, कांचन मोरे, निता पैठणे, उषा सगट, आम्रपाली गवई, दैनिक मेहकर टाइम्सचे वृत्त संपादक विशाल फितवे सर, यांच्यासह महिला व पुरुष मोठ्या प्रमाणात अशोका हॉल मध्ये उपस्थित होते. या कार्यक्रमाचे बहाद्दर सूत्रसंचालन कृष्णा हावरे सर यांनी केले. साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. भाऊ साठे समाजभूषण पुरस्कार २०२४, आदर्श सरपंच पुरस्कार , राज्यस्तरीय भीम रत्न पुरस्कार , आदर्श उद्योग प्रेरणा गौरव पुरस्कार, राज्यस्तरीय विधी तज्ञ आदर्श पुरस्कार, गुणवंत विद्यार्थी सन्मान सोहळा, तथागत भूषण आदर्श कार्यकर्ता पुरस्कार, आदर्श पत्रकार पुरस्कार, अशा एकूण आठ प्रकारात पुरस्कार वितरित करण्यात आला. बुलढाणा जिल्ह्यासह राज्यभरातून आलेल्या एकूण १४४ व्यक्तींना राज्यस्तरीय साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन युनुस भाई पटेल यांनी केले. पत्रकार सिद्धार्थ तायडे यांना साहित्यरत्न लोकशाही डॉ. अण्णाभाऊ साठे समाजभूषण पुरस्कार २०२४ मिळाल्याबद्दल त्यांचे गावकऱ्यासह समाज बांधवांकडून व मित्रमंडळी कडून अभिनंदन होत आहे.



# आचारसंहिता भंगाच्या २४५२ तक्रारी निकाली २५३ कोटींची मालमत्ता जप्त

**मुंबई -** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ साठी १५ ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर २०२४ पर्यंत राज्यभरात सी-व्हिजिल (C-Vigil app) ॲपवर एकूण २४६९ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी २४५२ तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात आल्या आहेत, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे. नागरिकांना आचारसंहिता पालनासाठी सहकार्य करणारे सी-व्हिजिल ॲप हे कोणत्याही प्ले स्टोअरमधून डाऊनलोड करता येते. या पद्वारे नागरिकांना आचारसंहिता भंगाबाबत तक्रार करता येते. तक्रार दाखल झाल्यानंतर संबंधित पथकाद्वारे चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्यात येते.

**२५३ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त**

राज्य व केंद्र शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या कारवाईत बेकायदा पैसे, दारू, ड्रग्ज व मौल्यवान धातू इत्यादी बाबतीत एकूण २५३ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. आचारसंहितेची राज्यात प्रभावी अंमलबजावणी सुरु आहे.

## पान १ वरुन

### जालना, घनसावंगी ...

अनिस शमशोद्दीन सय्य्द - अपक्ष- टीव्ही रिमोट, अफसर फरीद शेख चौधरी- अपक्ष- इस्त्री, अब्दुल हफीज अब्दुल गफार-अपक्ष- पेनाची निब सात किरणांसह, अर्जुन दादापाटील भांदरगे-अपक्ष-हातगाडी, अर्जुन सुभाष कणिसे- अपक्ष-कॅमेरा, अशोक उर्फ लक्ष्मीकांत मनोहर पांगारकर-अपक्ष-कपाट, आनंदा लिंबाजी ठोबरे-अपक्ष-ट्रक,,कुंडलिक विठ्ठल वखारे-अपक्ष-दुरदर्शन, गणेश दादाराव कावळे-अपक्ष-बादली, योगेश सखाराम कदम-अपक्ष-टीलर, रतन आसाराम लांडगे-अपक्ष-झोपाळा, विशाल लक्ष्मण हिवाळे - अपक्ष-गॅस शेगडी, सपना विनोद सुरडकर-अपक्ष-वाळुचे घडयाळ, ॲड. संजय रघुनाथ रौंदळे-अपक्ष-जातं याप्रमाणे आहेत.

बदनापुर विधानसभा मतदार संघातील उमेदवाराचे नाव, पक्षाचे नाव, चिन्ह पुढीलप्रमाणे कुचे नारायण तिलकचंद -भारतीय जनता पार्टी-कमळ, बबलु नेहरुलाल चौधरी- नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार -तुतारी वाजवणार माणुस, अन्ना साईनाथ चिन्नादोरे- स्वाभिमानी पक्ष-शिट्टी, आदमाने दिनेश दत्तात्रय-रिपब्लिकन सेना-ऑटो रिक्शा, कटके जयश्री संजय-महाराष्ट्र स्वराज्य पार्टी-पेनाची निब सात किरणांसह, नाडे ज्ञानेश्वर दगडुजी-ऑल इंडिया फारवर्ड ब्लॉक-सिंह, शैलेद्र सुदाम मिसाळ- पिपल्स पार्टी ऑफ इंडीया (डेमोक्रेटीक)-ट्रम्पेट, सतिश शंकरराव खरात-वंचित बहुजन आघाडी-गॅस सिलेंडर, संदीप आसाराम गवळी- समता पार्टी-लिफाफा, काकासाहेब बाबुराव भालेराव-अपक्ष-ग्रामोफोन, गायकवाड संगिता अंकुश-अपक्ष-शिवण यंत्र, चाबुकस्वार राहुल निरंजन-अपक्ष-नागरीक, बाबासाहेब हरिभाऊ खरात -अपक्ष-एअर कंडिशनर, राजेश ओंकारराव राऊत -अपक्ष-प्रेशर कुकर, सचिन विलकिसन कांबळे- अपक्ष-कपाट, सौ. सुश्मिता सुभाष डिघे-अपक्ष-किटली, ॲड.संतोष काशिनाथ मिमरोट-अपक्ष-स्पॅनर याप्रमाणे आहेत.

परतूर विधानसभा मतदार संघातील उमेदवाराचे नाव,पक्षाचे नाव, चिन्ह पुढीलप्रमाणे अहेमद महमद शेख - बहुजन सम ाज पार्टी - हत्ती, आसाराम जिजाभाऊ बोराडे (ए.जे.पाटील )- शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे )- मशाल, बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर)- भारतीय जनता पार्टी- कमळ, आसाराम सखाराम राठोड- पिपल्स पार्टी ऑफ इंडीया (डे.)-फळाची टोकरी, कृष्णा त्रिबंकराव पवार- ऑल इंडीया हिंदुस्थान काँग्रेस पार्टी- ट्रम्पेट, जाधव श्रीराम बन्सीलाल - जय सेवालाल बहुजन विकास पार्टी-प्रेशर कुकर, रामप्रसाद किसनराव थोरात-वंचित बहुजन आघाडी- गॅस सिलेंडर, अग्रवाल मोहनकुमार हरिप्रसाद-अपक्ष-किटली, अजहर युनुस शेख -अपक्ष -शिट्टी, जेथलिया सुरेशकुमार कन्हैयालाल - अपक्ष - दुरदर्शन, नामदेव हरदास चव्हाण- अपक्ष - ॲटो रिक्शा या प्रमाणे आहेत.

भोकरदन विधानसभा मतदार संघातील उमेदवाराचे नाव,पक्षाचे नाव, चिन्ह पुढीलप्रमाणे चंद्रकांत पुंडलीकराव दानवे- राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार)-तुतारी वाजवणारा माणुस-,दानवे संतोष रावसाहेब- भारतीय जनता पार्टी- कमळ, राहुल जांलिदर छडीदार-बहुजन समाज पार्टी-हत्ती, ॲड.साहेबराव माधवराव पंडीत- हिंदुस्तान जनता पार्टी-बॅटरी टॉर्च, मयुर रमेशराव बोर्डे-स्वाभिमानी पक्ष - शिट्टी, दिपक भिमराव बोऱ्हाडे-वंचित बहुजन आघाडी -गॅस सिलेंडर, दिगंबर बापुराव कऱ्हाळे-भारतीय विर किसान पार्टी-गन्ना किसान, विकास विजय जाधव-महाराष्ट्र स्वराज्य पार्टी- पेन निब सात किरणांसह, ॲड.शिरसाठ फकीरा हरी-पिपल्स पार्टी ऑफ इंडीया(डे.)-प्रेशर कुकर, गजानन सिताराम बर्डे-भारतिय आदिवासी पार्टी-टो रिक्शा, अजंली संधु भुमे-ऑल इंडीया फॉरवर्ड ब्लॉक-सिंह, सुनिल लक्ष्मणराव वाकेकर विदूथलाई विरुथलाईगल सथची-पॉट, सुनिल गिनाजी इंगळे-रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (डे)- बॅट, रवी विजयकुमार हिवाळे-अपक्ष-बलून, कडूबा म्हातारबा इंगळे- अपक्ष-केटल, यासीन सलिम मदार-अपक्ष-पल, केशव रामकिशन देठे-अपक्ष-रोड रोलर, केशव आनंदराव जंजाळ- अपक्ष-शिलाई मशीन, योगेश पाटील शिंदे- अपक्ष-स्पॅनर, वैशाली सुरेश दाभाडे -अपक्ष-ट्रम्पेट, महादू लक्ष्मण सुरडकर-अपक्ष-हॉकी आणि चेंडू, कैलास रा मदास पैजणे-अपक्ष-बॅटसमन, गणेश रतन साबळे-एअर कंडिशनर, नासेर दौद शेख -अपक्ष-अलमीरा, रफीक अब्बास शेख -अपक्ष-बेबी वॉकर, चंद्रशेखर उत्तमराव दानवे-अपक्ष-कॅरम बोर्ड, अकबर अली अकराम अली खान- अपक्ष-बकेट, जगन तुकाराम लोखंडे- अपक्ष- बिस्कूट, शिवाजी आत्माराम भिसे-अपक्ष-टेबल, निलेश बलीराम लाथे-अपक्ष-आयरन, जगदीश दिलीप राऊत-अपक्ष-टेलीविजन, दिवाकर कुंडलिक गायकवाड- अपक्ष-कोकोनट फार्म याप्रमाणे आहेत.

जिल्ह्यातील सर्वच विधानसभा मतदार संघात तिरंगी लढतीची शक्यता निर्माण झाली आहे.

### तीस हजार ...

होते. या प्रसंगी दौऱ्यात भाऊसाहेब कदम संदीपभैय्या गोरे, गणेशराव खवणे, सतीशराव निर्वळ, पंजाबराव बोराडे, विलास घोडके, दिपक बोराडे विठ्ठलमामा काळे, प्रसादराव बोराडे, नागेश घारे, श्रीराम मालदार, आतिष राठोड राहुल बाहेकर यांची उपस्थिती होती.

महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आणि पक्षांनी कितीही आदळ आपण केली तरी लाडकी बहीण योजना कदापि बंद होणार नाही प्रति महिना १५०० रुपयाप्रमाणे आतापर्यंत म हिलांच्या खात्यात ७५०० रुपये जमा झालेले आहेत यासाठी राज्य सरकारने ४० हजार कोटी रुपयांची तरतूद केलेली असून जो जोपर्यंत भारतीय जनता पक्ष शिवसेना राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे सरकार सत्तेत आहे तोपर्यंत ही योजना बंद होणार नाही अशी ग्वाही देखील यावेळी आमदार लोणीकरांनी दिली.

परतुर विधानसभा मतदारसंघाचा कायापालट करण्यासाठी मला प्रयत्न करता आले यापुढे देखील परतुर विधानसभा म तदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी मी सातत्याने प्रयत्नशील राहणार असून ज्येष्ठ नागरिक महिला माता भगिनी व युवा बांधवांसाठी सातत्याने काम करण्याचा प्रयत्न करणार आहे परतूर मतदारसंघातील तीनशे गावांना डांबरीकरणाचे रस्ते प्रत्येक गावात सिमेंट काँक्रिटीकरण चे रस्ते गावोगाव सांस्कृतिक सभागृह अनेक प्रशासकीय इमारती मागासवर्गीय मुलींसाठी परतुर व मंठा येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर म ुलींचे वस्तीगृह न्यायालयीन इमारती परतुर मंठा येथे भव्य क्रीडा संकुल यासह शेगाव पंढरपूर दिंडी मार्ग आरोग्याच्या सुविधा उपलब्ध हव्यात यासाठी परतुर व मंठा या दोन्ही ठिकाणी उपजिल्हा रुग्णालय अनेक ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र ३३ केव्ही १३२ केव्ही २२० केव्ही परतुर विधानसभा मतदारसंघात रस्त्याचा आणि विजेचे जाळ आपण निर्माण केलं असल्याचं यावेळी आमदार लोणीकर यांनी आवर्जून नमूद केलं.

परतूर तालुक्यासाठी उपजिल्हा रुग्णालय (६० कोटी रु), वाटूर, आष्टी, श्रीष्टी व सातोना येथे प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी (२४ कोटी ८८ लाख) असा एकूण ८४ कोटी ८८ लक्ष रु निधी तर मंठा तालुक्यासाठी उपजिल्हा रुग्णालय (६० कोटी), दहिफळ खंदारे व ढोकसाळ या दोन प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी (१२ कोटी ४४ लक्ष), तर खोराड सावंगी व उस्वद प्राथमिक आरोग्य उपकेंद्रसाठी (१ कोटी १० लाख) असे एकूण ७३ कोटी ५४ लक्ष रु निधी. मतदारसंघात २ उपजिल्हा रुग्णालयासाठी १२० कोटी प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी ३७ कोटी ३२ लाख तर २ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रासाठी १ कोटी १० लाख रुपये असा एकूण १५७ कोटी ४२ लक्ष रुपयांचा निधी आणला असल्याची माहिती आमदार बबनराव लोणीकर यांनी जनसंवाद दौऱ्यानिमित्त आयोजित गावागावात मार्गदर्शन करताना दिली.

# सकल ब्राह्मण समाजाचा भाजप आणि महायुतीला संपूर्ण पाठिंबा; पुण्यातून पत्र जारी

**पुणे । प्रतिनिधी -** महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणूकीसाठी भारतीय जनता पक्षाला आणि त्यासोबतच्या महायुतीला सकल ब्राह्मण समाज एकमुखाने पाठिंबा जाहीर करीत असल्याची घोषणा ब्राह्मण संघटनांचे मुख्य समन्वयक भालचंद्र कुलकर्णी आणि समन्वयक चैतन्य जोशी, मयुरेश अरगडे यांनी आज येथे केली. भाजपबरोबरच शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी पार्टी (अजित पवार गट) यांच्या महायुतीने ब्राह्मण समाजातील उमेदवारांना देखील प्राधान्य दिल्याने हा पाठिंबा जाहीर करत आहोत. राज्यातील विविध ठिकाणच्या मतदारसंघांमध्ये ब्राह्मण समाजाचा देखील विचार करावा अशी आमची मागणी होती, त्यावर भाजप व महायुतीने सकारात्मक विचार केला आहे.


उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (नागपूर) यांच्या सक्षम नेतृत्वाखाली ही निवडणूक होत आहे, त्यांच्याबरोबरच संजय केळकर (ठाणे), अतुल भातखळकर (कांदिवली), पराग अळवणी (विलेपार्ले), राजन नाईक (नालासोपारा), सुधीर गाडगीळ (सांगली) तसेच उदय सामंत (रत्नागिरी), किरण सामंत (राजापूर) या ब्राह्मण समाजातील उमेदवारांना निवडणूकीत उमेदवारी मिळाल्याने भाजपने सर्वसमावेशक असा विचार केल्याचे दिसून येते. त्याचबरोबर भाजपच्या राज्यातील संघटनात्मक कामाची महत्वपूर्ण जबाबदारीच्या महामंत्रीपदी राजेश पांडे यांची नुकतीच नियुक्ती झाली आहे तर कोथरुडच्या माजी आमदार प्रा. मेधाताई कुलकर्णी यांची राज्यसभा खासदारपदी बिनविरोध निवड झाल्याने ब्राह्मण समाजाबद्दल भाजपने दाखवलेल्या सकारात्मक भावनेची आम्ही आनंदाने दखल घेत आहोत.

हिंदुत्वाची पताका आपल्या खांद्यावर घेवून अधिक सकारात्मक काम करणारा राष्ट्रसमर्पित असलेला ब्राह्मण समाज आहे. या समाजाप्रती अत्यंत चांगली अशी सकारात्मक वागणूक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. त्यात सुरुवातीला खुल्या प्रवर्गासाठी अमृत महामंडळ दिले तर नुकतेच ब्राह्मण समाजासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळ हे स्वतंत्र महामंडळ देखील दिले आहे. याची सार्थ जाणीव आम्हा सर्वांना आहे. हिंदुत्वाच्या मुद्यावर ब्राह्मण समाजाने कायमच भाजपला साथ दिलेली आहे. राज्यातील सध्याचे वातावरण पाहता हिंदुत्वाचा मुद्दा भाजपने केंद्रस्थानी ठेवला आहे व हीच ब्राह्मण समाजाची देखील भूमिका आहे. आम्ही खालील सर्व ब्राह्मण संस्था, संघटनांचे पदाधिकारी हिंदुत्वाचा जयघोष व्हावा या हेतूने भारतीय जनता पक्षाला आणि त्यासोबतच्या महायुतीला जाहीर संपूर्ण पाठिंबा देत असल्याचे पत्र प्रसिद्धी माध्यमांना दिले आहे.

या पत्रावर चैतन्य जोशी, भालबंद्र कुलकर्णी, मयुरेश अरगडे आदींच्या स्वाक्षऱ्या असून अ.भा. ब्राह्मण महासंघ, आम्ही सारे ब्राह्मण, परशुराम सेवा संघ, ब्राह्मण जागृती सेवा संघ, याज्ञवल्क्य आश्रम चित्पावन, अस्तित्व संस्था, देशस्थ ऋग्वेदी शिक्षणोत्तेजक संस्था, सर्व शाखीय ब्राह्मण महासंघ, पुणे कन्हाडे ब्राह्मण संघ महाराष्ट्र, ब्राह्मण सभा, कृष्ण यजुर्वेदी तैतरीय संघ, अखिल ब्राह्मण संघ, राष्ट्रीय सेवा संघ, शुक्ल यजुर्वेदीय, माध्यंदिन मध्यवर्ती ब्राह्मण मंडळ, पुणे अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था (नाशिक), पुणे केंद्र आदी विविध संघटनांच्या नावाचा उल्लेख आहे.

# जिल्हा क्रिकेट असोशिएशन जालना तर्फे १९ वर्षाखालील जिल्हा संघ निवड चाचणी

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या राज्यस्तरीय निमंत्रितांच्या स्पर्धा होणार असून त्यासाठी जिल्हा क्रिकेट असोशिएशन जालना तर्फे १९ वर्षाखालील खेळाडूंसाठी जिल्हा संघ निवड चाचणी मंगलवार (दि. ०५) रोजी सकाळी १० : ०० वाजता, साईकाणे अकादमी stro Turf , MRD स्कूल जवळ, रोहन वाडी रोड जालना येथे घेण्यात येणार आहे .



या निवड चाचणी साठी *१ सप्टेंबर २००६ ( ०१/०९/२००६ ) नंतर जन्म लेल्या खेळाडूंना सहभागी होता येणार आहे.

इच्छुक खेळाडूंनी साईकाणे अकादमी stro Turf , MRD स्कूल जवळ, रोहनवाडी रोड जालना येथे मंगळवार (दि ५) स.१० : ०० वाजता या तारखेला जन्म प्रमाणपत्र, आधार कार्ड व आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या सत्यप्रती सह उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा क्रिकेट असोसिएशन जालनाचे अध्यक्ष ॲड. नरेंद्र देशपांडे, राजू काणे, अभिजीत चव्हाण यांच्यासह सदस्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

संघ निवड झालेल्या खेळाडूंना महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या राज्यस्तरीय आमंत्रितांच्या स्पर्धेत जालना जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळेल.

सर्व खेळाडूंनी क्रिकेट पोशाखात स्वतः च्या क्रिकेट साहित्यासह उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क - ९८२३३७३३६१ / ९९२२९३३१३८ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# वात्सल्य ट्रस्ट सानपाडा येथील गरजू विद्यार्थिनीं ना दिवाळी निमित्त मिळाला जॉय



**मुंबई । प्रतिनिधी -** दीपावली सणाच्या निमित्ताने मुंबई महाराष्ट्रातील अग्रगण्य जॉय ऑफ गिविंग संस्थेच्या वतीने दिनांक २ नोव्हेंबर रोजी सानपाडा स्थित बालिकाआश्रमातील जवळपास ५२ विद्यार्थ्यांना किराणा किट, दिवाळी फराळ, पेन, मिठाई ,पुस्तकं देऊन सहकार्य करण्यात आले.जॉय संस्थापक गणेश हिरवे यांच्या अनुपस्थितीत समन्वयक वैभव पाटील यांनी या कार्यक्रमाची आखणी केली होती.पाटील यांनी प्रास्ताविक करून जॉय संस्थेची माहिती उपस्थितांना दिली.यावेळी सुभाष हांडे देशमुख, डॉ सुभाष घोपल आणि प्रदीप पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. जॉय ग्रुप अत्यंत चांगल्या उद्देशाने राज्यातील विविध भागात जात असून समाजातील दुर्बल, गोर गरीब, वंचित घटकांसाठी पुढाकार घेत असून वर्षभर त्यांचे हे काम सुरूच असते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दत्ता रातवडकर, विजय फणसेकर, गजानन पाटील, निलेश घोडविंदे आदींनी खूप श्रम घेतले.यंदा दिवाळी निमित्त वंचितांच्या चेहऱ्यावर हसू फुलवण्यासाठी जॉय तर्फे २६ ऑक्टोबर रोजी वनवासी कल्याण आश्रम पनवेल येथे देखील मदत पोहचविण्यात आली होती.ज्यांना जॉय चे उपक्रमात सहभागी व्हायचे आहे त्यांनी ९९२०५८१८७८ संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# संस्कृती जपण्याचे काम मारवाडी समाजाने केले-मनोज लोहिया

## मारवाडी संमेलन व युवा मंचचे सर्वधर्मीय दीपावली स्नेहमिलन व अन्नकुट उत्सव थाटात संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** मारवाडी समाज ज्या ठिकाणी जातो, येथील संस्कृती आणि रंगात मिसळून जाऊन तेथील मातीशी एकरूप होतो. हा समाज ज्या शहरात मोठ्या संख्येने असतो, त्या शहराचे नाव जागतिक पातळीवर झळकते. स्टील आणि सीड सिटी ही जालन्याची जगात झालेली ओळख त्याचे मूर्तिमंत उदाहरण आहे. देशाला बळकटी देण्याबरोबरच संस्कृती जपण्याचे महत्त्वाचे कार्य मारवाडी समाजाने केले आहे, असे प्रतिपादन सेवानिवृत्त पोलीस महानिरीक्षक मनोज लोहिया यांनी येथे बोलताना केले.

अखिल भारतवर्षीय मारवाडी संमेलन शाखा जालना, मारवाडी युवा मंच जालना आणि महाराष्ट्र मारवाडी चॅरिटेबल फाउंडेशन जालना यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि. २ नोव्हेंबर रोजी सायंकाळी रुक्मिणी गार्डन येथे आयोजित सर्वधर्मीय दीपावली स्नेहमिलन व अन्नकुट उत्सवात प्रमुख वक्ते म्हणून श्री. लोहिया बोलत होते.

दीपावली स्नेहमिलनाचे उद्घाटन खा. डॉ. कल्याण काळे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी उद्योगपती पन्नालाल बगडिया हे होते तर आशीर्वचन देण्यासाठी पं. मनोज महाराज गौड, पं. सत्यनारायण महाराज व्यास उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून आ. कैलास गोरंट्याल, माजी राज्यमंत्री तथा जालना बाजार समितीचे सभापती अर्जुनराव खोतकर, माजी नगराध्यक्ष भास्करराव आंबेकर, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष भास्करराव दानवे, कैलासचंद्र अग्रवाल,

राष्ट्रीय संघटन मंत्री वीरेंद्र धोका, महाराष्ट्र प्रदेश सभेचे महामंत्री सुदेश करवा, उपाध्यक्ष उमेश पंचारिया,मारवाडी संमेलनचे जिल्हा कार्याध्यक्ष सीए गोविंदप्रसाद मुंदडा, माहेश्वरी सभेचे छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष शिवनाथ राठी, गोपाल घनश्यामदास गोयल, विजय कामड, रामकुवर अग्रवाल, विप्र फाउंडेशनचे जिल्हाध्यक्ष रामनिवास गौड, जेपीसी बँकेचे चेअरमन संजय मुथा, जनसेवा ग्रुपचे अध्यक्ष पुरुषोत्तम मोतीवाला, महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी संमेलनचे प्रवक्ते मनीष तवरावाला, सहमंत्री पवन जोशी, संयुक्त मंत्री लक्ष्मीनारायण मानधना, संघटन मंत्री सुनील राठी, रवी अग्रवाल आदींची उपस्थिती होती.



उद्घाटनपर भाषणात खा. डॉ. कल्याण काळे यांनी जालना हे उद्योगपती आणि व्यापाऱ्यांचे शहर असून, येथे मोठी स्टील इंडस्ट्री असल्याचे सांगून व्यापारी आणि उद्योगपतींच्या कर्तृत्वामुळे जालन्याचे जागतिक पटलावर नाव आहे, असे ते म्हणाले. आ. कैलास गोरंट्याल यांनी अमरधाम स्मशानभूमीतील मारवाडी समाजाची स्मशानभूमी अतिक्रमणमुक्त करण्यासाठी आपण विशेष प्रयत्न करू, असे सांगितले. माजी मंत्री अर्जुनराव खोतकर म्हणाले की, मारवाडी समाज रोजगार देणारा समाज आहे. हा समाज कस्तुरीप्रमाणे आहे. तो कुठेही असू द्या, आजूबाजूला असलातरी या समाजाचे गुण लागतात. भास्करराव आंबेकर म्हणाले की, देशाची अर्थव्यवस्था ज्यांच्या खांद्यावर आहे त्या मारवाडी समाजाशिवाय धर्मकारण, राजकारण आणि समाजकारण अशक्य आहे. भास्करराव दानवे म्हणाले की, जालना हे दानशुरांचे शहर असून, जेव्हा महाराष्ट्र अथवा देशावर संकट येते, तेव्हा धावून जाण्यात मारवाडी समाज अग्रेसर असतो. शिवनारायण राठी म्हणाले की, गेल्या ४१ वर्षापासून दिवाळी स्नेह मिलन कार्यक्रमाच्या माध्यमातून समाज बांधवांना एकत्र आणण्याचे कार्य होत आहे. स्वागताध्यक्ष संजय राठी यांनी दिवाळी स्नेहमिलन कार्यक्रमाला ४१ वर्षाची अखंडित परंपरा लाभलेली असून, शहरातील उद्योजक, व्यापारी आणि विविध घटकातील मान्यवरांच्या योगदानामुळे आम्ही ही परंपरा अखंडितपणे कायम राखत असल्याचे सांगितले

प्रास्ताविकपर भाषणात वीरेंद्रप्रकाश धोका यांनी मारवाडी समाजाचे प्रश्न आणि समस्या अधोरेखित केल्या. याप्रसंगी पन्नालाल बगडिया व परिवाराच्यावतीनेअन्नकुट प्रसादीचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पवन जोशी आणि सुदेश करवा यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार शरद काबरा यांनी मानले. यावेळी समाज बांधव आणि सर्वधर्मीय नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सापेले आदिवासी पाड्यावर फराळ वाटप...!



**कर्जत । प्रतिनिधी -** जनजागृती सेवा संस्था ही सामाजिक क्षेत्रात नेहमीच समाजाचे गांभिर्य लक्षात ठेवून वावरत असते.विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून ही संस्था आणि संस्थेचे सभासद समाजकार्य करण्यासाठी नेहमीच तयार असतात.कर्जत येथील संस्थेच्या सदस्यांनी हा फराळ वाटपाचा कार्यक्रम हाती घेतला होता. दीपोत्सव अर्थात अंधार भेदून प्रकाशाकडे घेऊन जाण्याचा संदेश देणारा सण. गरीब व गरजू लोकांची दिवाळी गोड जावी या उद्देशाने दिवाळी पाडव्याचे औचित्य साधून जनजागृती सेवा संस्थेने कर्जत तालुक्यातील कडाव येथील सापेले आदिवासी पाड्यावर लहान मुलांना चॉकलेट, आदिवासी भगिनींना आकर्षक पणती व फराळ वाटप करण्यात आले.प्रमुख पाहुणे म्हणून माऊली फाऊंडेशनचे उपाध्यक्ष व पत्रकार पंकेश जाधव,ॲड. सई सावंत, वनिता पाटील, रोहित पाटील हे उपस्थित होते. आदिवासी पाड्यावरील भगिनींना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते फराळ वाटप करण्यात आला. फराळ वाटप उपक्रम यशस्वी करण्यासाठी सचिन भंडारी, दत्ता कडुलकर,गंधाली तिरपणकर, संचिता भंडारी, पत्रकार पंकेश मधुकर जाधव, सार्थक भंडारी यांनी विशेष परिश्रम घेतले. हा उपक्रम संस्थेच्या सचिव सौ.संचिता सचिन भंडारी यांनी स्वतः पुढाकार घेऊन यशस्वीरित्या राबविला,त्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी त्यांचे विशेष आभार मानले. शेवटी उपस्थित बंधु-भगिनींना दिवाळी पाडव्याच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

# माहीम, वरळीत तिरंगी लढत

मुंबई - राज्यातील विधानसभा निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज माघारी घेण्याचा आज शेवटचा दिवस होता, त्यामुळे बऱ्याच नाट्यमय घडामोडी घडल्याचं पाहायला मिळालं. राज्याचं लक्ष लागलेल्या माहीम मतदारसंघातून शिवसेना महायुतीचे उमेदवार सदा सरवणकर आपला उमेदवारी अर्ज माघारी घेणार का, हे पाहणे औत्सुक्याचे ठरले. मात्र, सदा सरवणकर यांनी आपली उमदेवारी कायम ठेवली असून मनसे अध्यक्ष राज ठाकरेंच्या भेटीसाठी शिवतीर्थ बंगला गाठला होता. मात्र, राज ठाकरेंनी सदा सरवणकर यांना भेट नाकारत स्पष्ट संदेश दिला. त्यामुळे, माहीम मतदारसंघात तिरंगी लढत होणार असल्याचे निश्चित झालं आहे. राजधानी मुंबईत कुलाबा ते दहीसर एकूण ३६ आमदार आहेत, ३६ मतदारसंघ आहेत. त्यापैकी, मुंबई शहरमध्ये १० मतदारसंघ येतात, या १० मतदारसंघातील उमेदवारांच्या लढती निश्चित झाल्या आहेत.

मुंबईत प्रमुख उमेदवार कोण असणार आमने-सामने: धारावी विधानसभा मतदारसंघ १) डॉ. ज्योती एकनाथ गायकवाड - इंडियन नॅशनल काँग्रेस, २) मनोहर केदारी रायबागे - बहुजन समाज पार्टी ३) राजेश शिवदास खंदारे - शिवसेना, सायन कोळीवाडा विधानसभा मतदारसंघ १) गणेश कुमार यादव - भारतीय राष्ट्रीय काँग्रेस २) कॅप्टन आर तमिल सेल्वन - भारतीय जनता पार्टी ३)संजय प्रभाकर भोगले - महाराष्ट्र नवनिर्माण सेना, वडाळा विधानसभा मतदारसंघ १) कालिदास निळकंठ कोळंबकर - भारतीय जनता पार्टी २) श्रध्दा श्रीधर जाधव - शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) ३) स्नेहल सुधीर जाधव - महाराष्ट्र नवनिर्माण सेना, माहिम विधानसभा मतदारसंघ १) अमित राज ठाकरे - महाराष्ट्र नवनिर्माण सेना २) महेश बळीराम सावंत - शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) ३) सदानंद शंकर सरवणकर - शिवसेना, वरळी मतदारसंघ १) आदित्य उद्धव ठाकरे - शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) २) मिलिंद मुरली देवरा - शिवसेना ३) संदीप सुधाकर देशपांडे - महाराष्ट्र नवनिर्माण सेना ४) अमोल आनंद निकाळजे - वंचित बहुजन आघाडी या उमेदवारांचा समावेश आहे.

# इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**परतूर । प्रतिनिधी.-** परतुर येथील विवेकानंद इंग्लिश स्कूल परतुर शाळेतील गुणवंत विद्यार्थी नुकतेच महाराष्ट्रातील विविध शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तसेच आयआयटी इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये गुणवंत झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये सम्यक लाहोटी(खखढ खरगपुर), मेघराज शिंदे (खखढ जबलपुर),वेदांत बाहेकर(सत्य साई मेडिकल कॉलेज चेन्नई),विवेक गिरी (शासकीय मेडिकल कॉलेज बारामती) पार्थ बाहेकर (शासकीय मेडिकल कॉलेज लातूर) ,आर्या कदम (शासकीय मेडिकल कॉलेज अंबाजोगई),विवेक गिरी (शासकीय मेडिकल कॉलेज बारामती),पार्थ बाहेकर(शासकीय मेडिकल लातूर),सानिका कदम (मेडिकल




कॉलेज धुळे,)आदित्य भेंडाळकर (मेडिकल कॉलेज अमरावती), अभिजीत थोरात (मेडिकल कॉलेज लातूर), भागवत माने (सरस्वती मेडीकल कॉलेज उत्तर प्रदेश), अभिजीत घनवट,बीव्हीडी उदगीर), शिवम राऊत (बीएएमएस संभाजीनगर), राहुल अंभोरे (मेडिकल कॉलेज उत्तर प्रदेश)साक्षी सोम्मारे(बीडीएसलोणी), यश दरगड इंजीनीयरिंग पुणे,) प्रज्वल बाहेकर, (इंजीनीयरिंग पुणे,), श्रद्धा शर्मा ,राम देव बाबा इंजीनियरिंग कॉलेज)नागपूर. इत्यादी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी उपस्थित डॉक्टर शेषराव बाहेकर ,संदीप बाहेकर,सुभाष अन्ना अंभुरे, प्राचाय दिरंगे डॉक्टर प्रशांत अंभोरे,डॉक्टर प्रमोद आकात, डॉक्टर सोळंके, प्राकाश दिक्षीत,प्राचार्य संगीता बाहेकर,प्राचार्य भालचंद्र महाजन,आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

# आदिती अर्बन बँकेवर डल्ला मारणारे बँकेचेच कर्मचारी

## बनावट सोने तारण कर्ज प्रकरण उघड होऊ नये म्हणून रचला होता बँक लुटण्याचा कट- पोलीस अधिक्षक बन्सल

**जालना । प्रतिनिधी** - शहरातील जुना मोंढा परिसरात असलेल्या आदिती अर्बन को ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लि. बुलढाणा जालना शाखेच्या बाँकेचे शटर लॉक तोडुन लॉकरमधील ११ लाख ५६ हजार रोख रक्कमेसह १९ लाख ७६ हजार रुपये किमतीची ग्राहकांनी तारण ठेवलेले २४७ ग्रॅम सोन्याचे दागिन्यांवर उल्ला मारणारे आरोपी हे बँकेतील कर्मचारी असल्याचे उघड झाले आहे. तीन्ही आरोपींना पोलीसांनी अटक केली असून या गुन्ह्याची त्यांनी कबुली दिली असल्याची माहिति पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांनी पोलीस अधिक्षक कार्यालयात सोमवार (दि ४) रोजी आयोजित पत्रकार परिषदेत दिली आहे. बनावट सोने तारण कर्ज प्रकरण उघड होऊ नये म्हणून त्यांनी बँक लुटण्याचा कट रचला असल्याचेही पोलीस अधिक्षक बन्सल यांनी यावेळी सांगितले.

आदिती अर्बन को ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लि. बुलढाणा, शाखा-जालना ही बँक दिवाळी निमित्ताने सुटी असल्याने बंद होती. याचा फायदा घेत रविवार (दि. ०३) रोजी बँकेचे शटर लॉक तोडुन, लॉकरमधील रु.११,५६,000/- रोख रक्कम व रु.१९,७६,000/- किमतीचे बँकेच्या ग्राहकांनी तारण ठेवलेले २४७ ग्रॅम सोन्याचे दागिने चोरी झाल्याची तक्रार बैंक मॅनेजर प्रकाश आसाराम बाविस्कर, (रा. छत्रपती संभाजीनगर) यांनी दिनांक ०३/११/२०२४ रोजी दिली. त्यानुसार मॅनेजर यांच्या फिर्यादीवरुन सदर बाजार पोलीस ठाणे, जालना येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळाची पाहणी करुन गुन्हा उघडकीस आणण्याबाबत स्थानिक गुन्हे शाखा व सदर बाजार पोलीसांना सुचना दिल्या होत्या. अज्ञात आरोपितांचा शोध घेत असतांना बँकेत काम करणारा कर्मचारी रोखपाल गोवर्धन विष्णु सवडे (वय २२, रा. बाजीउम्रद ता.जि. जालना) यांच्याकडे गुन्ह्याच्या अनुषंगाने चौकशी करत असतांना गोवर्धन सवडे यांचे वर्तन संशयास्पद वाटल्याने त्यास विश्वासात घेऊन अधिक चौकशी केली असता त्यांनी व त्याचे साथीदार लक्ष्मण नारायण डोंगरे (वय २६ रा. मौजपुरी. ता.जि. जालना), जगदीश आनंता लोलेवार (वय २१, रा. लक्ष्मीनारायणपुरा, जालना) व अन्य एका साथीदाराच्या मदतीने गुन्ह केल्याची कबूली दिली. तीन्ही आरोपीतांना पोलीसांनी ताब्यात घेऊन चोरी करण्याचे कारण विचारले असता त्यांनी सांगितले की, तिघांनी संगनमत करुन बँकेमध्ये पाच बनावट सोने तारण ठेवून कर्ज घेतले होते. या कर्जाचे हफ्ते भरणे शक्य होत नसल्याने व कर्जाची रक्कम थकीत होत असल्ययाने सोने तारण कर्ज प्रकरण उघड होवू नये म्हणून त्यांनी बँक फोडण्याचा कट रचला व दि. ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी बँकेतील रक्कम व सोने चोरी केले. दि. १ नोव्हेंबर २०२४ रोजी बँकेत अनार फटाका लावून लॉकर जाळण्याचा प्रयत्न केला. तसेच बँकेच्या शटरचे लॉक बाहेरुन तोडून आणून ते शटरच्या बाहेर ठेवून बँक फोडल्याचा बनाव केला असल्याचेही एसपी बन्सल यांनी यावेळी सांगितले.

गुन्हयातील आरोपी नामे ।) गोवर्धन विष्णु सवडे, वय-२२ वर्ष, व्यवसाय-रोखपाल, (कॅशिअर), रा. बाजीउम्रद, ता.जि. जालना २) लक्ष्मण नारायण डोंगरे, वय-२६ वर्ष, व्यवसाय-बैंक लिपीक, रा. मौजपुरी, ता.जि. जालना ३) जगदीश आनंता लोलेवार, वय-२१ वर्ष, व्यवसाय-बँक शिपाई रा. लक्ष्मीनारायणपुरा, जालना यांच्या ताब्यातुन गुन्हयातील रोख रक्कम रु.९,९३,000/- व रु.८,८६,000/- किं. चे दागिने असा एकुण रु. १८,७९,000/- किंमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सिध्दार्थ बारवाल, भा.पो.से., स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सदर बाजार पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक संदीप भारती, सपोनि. यागेश उबाळे, सपोनि. आनंदसिग साबळे, पोउपनि. शैलेश म्हस्के, स्था. गु.शा.चे पोउपनि, राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार रामप्रसाद पव्हरे, रमेश राठोड, प्रभाकर वाघ, गोपाल गोशिक, लक्ष्मीकांत आडेप, सागर बाविस्कर, सुधीर वाघमारे, दत्ता वाघुंडे, ईरशाद पटेल, सतिष श्रीवास, आकुर धांडगे, देविदास भोजने, व सदर बाजार पोलीस ठाणेचे पोलीस अंमलदार रामप्रसाद रंगे, जगन्नाथ जाधव, नजीर पटेल, अजीम शेख, दुर्गेश गोफणे, गणेश तेजनकर, राहुल कटकम, यांनी केली आहे.

**स्थागुशाखेचे पंकज जाधव यांची थोपाटली पाठ**

आदिती अर्बन बँक गुन्हा प्रकरणातील आरोपींना अवघ्या तीन ते चार तासात ताब्यात घेतल्याबद्दल पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांच्यासह पथकातील अधिकारी-कर्मचाऱ्यांची स्तुती करत शाबासकी दिली. त्यांना या गुन्ह्याची उकल केल्याप्रकरणी रिवार्ड, प्रमाणपत्र देण्यात येणार असल्याचेही एसपी बन्सल यांनी सांगितले.

### सीसीटीव्ही; ऑनलाईन बॅकअपची व्यवस्था करा; बँकांना पोलीस अधिक्षकांचे आवाहन

आदिती अर्बन बँके प्रकरणात आरोपीतांना बँकेतील सीसीटीव्हीसाठी असलेला डिव्हीआर गायब केला. डिव्हीआर गायब केल्याने तपासात अडचणी निर्माण होतात. त्यामुळे अर्बन बँक, पतसंस्था व इतरांनी सीसीटीव्ही लावल्यानंतर ऑनलाईन बॅकअपची व्यवस्था करावी असे आवाहन यावेळी पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांनी केले आहे. किमान गेल्या चार-पाच दिवसांचे अथवा आठवडाभराचे ऑनलाईन बॅकअपची व्यवस्था झाल्यास डिव्हीआर चोरी केल्यास अथवा डॅमेज केल्यास ऑनलॉईन बॅकअपमुळे चोरट्यांचा शोध घेणे सोपे होईल. यासंदर्भात बँक मॅनेजर व व्यापाऱ्यांना या ऑनलाईन बॅकअप बाबत अवगत करण्यात येणार असल्याचेही श्री बन्सल यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.